डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,
कृषी संशोधन केंद्र,सिंदेवाही ४४१२२२ जि. चंद्रपूर

E-mail : adrzarssindewahi@pdkv.ac.in

जावक क्रं. ससंसं/विकृसंकें/४३३/२०२४ दिनांक: ०८ /०८ /२०२४

## निविदा सुचना

प्रति, ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

**विषय :- सन २०२४-२५ मध्ये कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि. चंद्रपूर,डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील धान पिकाचे संशोधनात्मक प्रयोगांचे कामे कंत्राटीपध्दतीने करण्याकरीता कुशल / अकुशल मजुरांचे (स्त्री/ पुरूष) दर प्रती दिवसानुसार दर पुरविणेबाबत.....**

उपरोक्त विषयास अनुसरून कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर येथील प्रक्षेत्रावरील धान पिकाचे संशोधनात्मक प्रयोगांचे (साधारणत: १०.० हेक्टर क्षेत्र) कामे करण्याकरीता मजुरांचे (स्त्री/ पुरूष) दर प्रती दिवसानुसार कंत्राटदाराकडून निविदा (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

**निविदा (कोटेशन) मसुदा**

| अ. क्रं. | प्रक्षेत्रावरील करावयाची कामे | तपशिल | दयावयाचे दर प्रति दिवस ( रू.) |
|---|---|---|---|
| १ | अकुशल मजुर (संशोधन प्रयोगासंबंधी सर्व कामे) | प्रति मजुर (स्त्री/ पुरूष) | |
| २ | कुशल मजुर (ट्रॅक्टर व कृषि यंत्रे अवजारे चालविणे व इ.कामे) | प्रति मजुर (स्त्री/ पुरूष) | |

**अ**

**टी व शर्ती:-**

१ निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ वाजता यावेळेस स्विकारल्या जातील.

२ निविदा /कोटेशन सहयोगी संशोधन संचालक, कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर यांच्या नावाने सिलबंध लिफाफामध्ये पाठवावे.

३ कंत्राटदाराकडे संबंधीत कामाचा वैद्य परवाना असणे आवश्यक आहे.कंत्राटदाराला परवाना व संबंधीत इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४ कंत्राटपध्दतीने प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग, व इतर संबंधीत कामे करण्यासाठी वापरण्यात येणा-या स्त्री किंवा पुरुष मजुराचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.



Scanned with OKEN Scanner

५ कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर येथिल प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग,बिजोत्पादन कार्यक्रम व इतर संबंधीत कामे करीत असतांना पिकाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषा प्रमाणे नुकसान भरपाई संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

६ .प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग, व इतर संबंधीत कामे करतेवेळी कुटलीही दुर्घटना,अपघात,जिवीतहाणी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी,अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

७ सर्व कामे पूर्ण करण्यात यावे,कामाबाबद तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधीत कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

८ कंत्राटदारांने देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

९ प्रक्षेत्रावरील कामे करीत असतांना कोणताही वाद/विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विभागाचे अधिकारी मा.सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही,जि.चंद्रपूर यांचे समक्ष मिटवला जाईल व अंतिम निर्णय मा.सहयोगी संशोधन संचालक,विभागीय कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही,जि.चंद्रपूर यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१० निविदा / कोटेशन मधील संबंधित कामे कंत्राट पध्दतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

११ प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग,बिजोत्पादन कार्यक्रम व इतर संबंधीत कामे ही एक वर्षामधिल खरीप,रब्बी व उन्हाळी या तिनही हंगामाकरीता असून कामाचे दर ११ महिनाकरीता वैद्य राहतील.

१२ कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर, अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील धान बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे करीत असतांना पिकाचे तसेच वाहन विभाग संबंधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे / वाहनांचे / नविन सुटया भागाचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

१३ निविदाचा काही भाग किंवा संपूर्ण निविदा स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.

१४ या कार्यालयातर्फ कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम तसेच संशोधन प्रयोग संबधित कामे करण्याकरीता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही.संबंधित काम करण्याकरीता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१५ कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर, अंतर्गत प्रक्षेत्रावरील धान बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी मजुर हे **१८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षा पेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्टया सक्षम असावेत.**



Scanned with OKEN Scanner

१६ कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर, अंतर्गत प्रक्षेत्रावरील धान बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचा-यांकडे संबंधित तांत्रिक कामाची पदविका / आटीआय प्रमाणपत्र / वाहन चालविण्याचा परवाना व कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१७ पुरवठा धारकाचे मजुर पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाची कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही.मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

१८ कामाच्या आवश्यकतेनुसार मजुर उपलब्ध करून दयावे लागतील.

१९ मजुरांची कामाची वेळ ही आठ तास ठरवून दिल्याप्रमाणे राहील.

२० सदर संस्था/कंपणी/ठेकेदार असमाधानकारक काम असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकत्याकडे असतील.

२१ सदर बाबतचे देयक सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

२२ **निविदा भरणा-यास निविदेसोबत कंत्राटी कामाच्या एकुण रक्कमेच्या ५ टक्के सुरक्षा ठेव धनादेशादवारे निविदेसोबत दयावी लागेल व निविदा उघडल्यानंतर ज्या निविदा धारकाचे दर कार्यालयाने स्वीकारले नाही (दर सर्वात कमी नसल्यामुळे) त्यांची सुरक्षा ठेव परत करण्यात येईल तसेच ज्यांना कंत्राट मिळाले(दर सर्वात कमी असल्यामुळे)त्याला त्याचे कंत्राटी काम पुर्ण झाल्यावर ५ टक्के सुरक्षा ठेव परत करण्यात येइल.**

२३ वरील अटी व शर्ती परिस्थितीनुसार मध्ये सुट देण्याचा किंवा निविदा /कोटेशन उशीरा प्राप्त झाल्यास ते नाकारण्याचा अधिकार सहयोगी संशोधन संचालक, कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर यांच्याकडे राहील.

२४ वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिलानुसार दि. १९ /०८/२०२४ रोजी पर्यंत कार्यालीन वेळेत निविदा सिलबंद लिफाफामध्ये सादर करावी.

**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र,**
**सिंदेवाही जि.चंद्रपूर.**



Scanned with OKEN Scanner